**Goan Varta, Wednesday 02 October 2019**

# 'मल्लिकार्जुन' मध्ये फुलशेती कार्यशाळा





■ रायन मास्कारेन्हास
कृषी महाविद्यालय, केपे

**डॉन बॉस्को कृषी महाविद्यालय सुळकर्णा-** केपे येथील 'अॅग्रीबुस्टर' गटाच्या विद्यार्थ्यांनी रावेप (Rawep) ग्रामीण कृषी कार्यानुभव या सदराअंतर्गत फुलशेती मार्गदर्शनपर कार्यशाळा नुकतीच काणकोणच्या मल्लिकार्जुन कला, वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी उत्साहात पार पाडली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज कामत, वनस्पतीशास्त्राच्या सहायक प्राध्यापकअक्षता फर्नांडिस, उद्यानविद्याचे सहायक प्राध्यापक डॉ. गौरीश करंजाळकर, शंभू गावकर इत्यादी मान्यवरांची उपस्थिती होती.

कृषी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फुलशेतीचे विविध पैलू सांगितले. नंतर त्याबाबतच्या अद्ययावत तंत्रज्ञानाविषयी प्रात्यक्षिकांसह योग्य ते मार्गदर्शन केले.

ऑरकीड, अॅन्थुरियम, जरबेरा, ग्लॅडीओलस असा फायदेशीर उत्पन्न देण्याच्या फुलपीकांशी शेती कशी करावी, हरितगृहात त्यांचे कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन कसे घ्यावे, त्यांना आवश्यक असणाऱ्या आंतर- मशागतीची कोणती कामे कशी आणि केव्हा करावीत, त्यावर पडणारे विविध रोग व कीड, त्यांचा अटकाव करण्यासाठी वापरात येणाऱ्या पद्धती इत्यादी बाबत कृषी विद्यार्थ्यांनी उपयुक्त मार्गदर्शन केले. याशिवाय ग्राफिक बडींग, लेयरींग, कटींग याद्वारे फुलपीकांची शेती कशी करता येईल, याची प्रात्यक्षिके दाखविली.

फुलशेतीत हातखंडा असलेले कृषी महावि-द्यालयाचे विद्यार्थी रायन मास्कारेन्हास, अक्षय गावकर, साहिल वेळीप, संदेश गावकर, सपनेश तवडकर आणि कार्तिक वैद्य इत्यादी अनेक विद्यार्थ्यांनी वरील अंगाविषयी माहिती सांगताना हिरीरीने सहभाग घेतला.

मल्लिकार्जुन विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी अनेक शंका विचारल्या. त्यांना कृषी विद्यार्थ्यांनी समर्पक उत्तरे देऊन शंकांचे योग्य निरसन केले.

**(लेखक विद्यार्थी आहेत.)**